राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ/३४२१/२०२१/सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| केशव साहेबराव निंबाळकर | वनपरिक्षेत्र अधिकारी, पुणे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, (प्रादेशिक), ता. तासगाव जि. सांगली | सहायक वनसंरक्षक सांगली वनविभाग सांगली, |

व्दितीय अपील सुनावणी दिनांक-१५/११/२०२२

अपिलार्थी यांनी दि.२०/१०/२०२० रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे 'अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही ' असे प्रयोजन नमूद करून कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केली.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी हजर आहेत, तर विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कडे सन २०२० पासूनची खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

'शासकिय वाहनाचे लॉगबुक व हिस्ट्रीशिट ची प्रमाणित प्रत.'

तदनंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र 'ब' मध्ये 'विहित मुदतीत माहिती अप्राप्त/टाळाटाळ' असे प्रयोजन नमूद करून प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की,

१) अपिलार्थीचे माहिती अर्ज चारही माहिती दि.३०/०६/२०२० रोजीचे आहेत.
२) सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी सांगितले की, प्रस्तुत सर्व प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली अपूर्ण आहे. त्यामुळे सदर संचिका अवलोकनास देऊन पूर्ण माहिती देण्याचे आदेश होण्यास विनंती आहे.
३) सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांनी सुचित केले की, अर्जदारास् उपलब्ध माहिती पुरविली आहे.

४) अपिलार्थीची सर्व प्रथम अपिले दिनांक ०३/०२/२०२१ रोजीची आहेत. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश दिला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य ठरवून अपिल निकाली काढले.

५) आयोगाकडे उपलब्ध अभिलेखवरुन दिसून येते की, अर्जदाराने दाखल केलेले माहिती अर्ज कोरोना कालावधीतील असल्याने व सदर कालावधीत शासकिय प्रतिबंध असल्याने जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून झालेला विलंब माफ करण्यात येत आहे. तसेच, अर्जदाराने विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याने अपिलार्थीने अवलोकनाची मागणी केली आहे. सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांत अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन माहितीचे अवलोकन द्यावे, अवलोकनांती, त्यांना नियमानुसार देय असलेली एका विषयाची एक वर्षाची माहिती विनामूल्य पुरवावी व जी माहिती पुरविता येत नाही, त्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीस कळवावे.

वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र. ३४२१/२०२१/सांगली/ 07/05/2022 दिनांक - 1/5/4/22

प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-

१. मुख्य वन संरक्षक, सांगली.

यांना कळविण्यांत येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/ प्र.क्र. २१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनानुसार सदर प्रकरणी आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.